सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २० फेब्रुवारी २०१७.

### १० महानगरपालिका, ११ जिल्हा परिषदा व ११८ पंचायत समित्यांसाठी आज मतदान

३ हजार २१० जागांसाठी १७ हजार ३३१ उमेदवारांमध्ये लढत

### निवडणूक आयोगाची यंत्रणा सज्ज: राज्य निवडणूक आयुक्त

मुंबई, दि. २०: राज्यातील १० महानगरपालिका आणि दुसऱ्या टप्प्यातील ११ जिल्हापरिषदा व त्यांतर्गतच्या ११८ पंचायत समित्यांसाठी उद्या (ता.२१) मतदान होत असून या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण ३ हजार २१० जागांसाठी १७ हजार ३३१ उमेदवारांमध्ये लढत होत आहे. त्यासाठी ३ कोटी ७७ लाख ६० हजार ८१२ मतदारांकरिता ४३ हजार १६० मतदान केंद्रांची; तसेच ६८ हजार ९४३ कंट्रोल युनिट व १ लाख २२ हजार ४३१ बॅलेट युनिटसह यंत्रांची व्यवस्था करण्यात आली. त्याचबरोबर २ लाख ७३ हजार ८५९ कर्मचाऱ्यांसह आवश्यक तेवढा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

राज्य निवडणूक आयोगाच्या येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आयोगाचे सचिव शेखर चन्ने यावेळी उपस्थित होते. श्री. सहारिया यांनी सांगितले की, ११ जानेवारी २०१७ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पहिल्या टप्प्यातील १५ जिल्हा परिषदा आणि १६५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १६ फेब्रुवारी २०१७ रोजी सुरळीतपणे मतदान प्रक्रिया पार पडली. दुसऱ्या टप्प्यात ११ जिल्हा परिषदा आणि ११८ पंचायत समित्यांसाठी मतदान होईल. गडचिरोली जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची दोन टप्प्यात विभागणी करण्यात आली होती. या जिल्ह्यातील ८ पंचायत समित्या व त्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभागांसाठी पहिल्या टप्प्यात मतदान झाले; तर ४ पंचायत समित्या व त्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभागांसाठी दुसऱ्या टप्प्यात मतदान होईल.

वर्धा जिल्हा परिषदेच्या २ आणि यवतमाळ जिल्हा परिषदेच्या ६ जागांबरोबरच त्यांतर्गतच्या पंचायत समितीच्या १६ जागांसाठीदेखील उद्या मतदान होत आहे. न्यायालयीन प्रकरणांमुळे या ठिकाणी पहिल्या टप्प्यात मतदान घेण्यात आले नव्हते, असे स्पष्ट करून श्री. सहारिया म्हणाले की, सर्व १० महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी मात्र सर्व ठिकाणी एकाच दिवशी मतदान होत आहे. महानगरपालिकेच्या १ हजार २६८ जागांसाठी ९ हजार २०८ उमेदवार रिंगणात आहेत. जिल्हा परिषदेच्या ६५४ जागांसाठी २ हजार ९५६; तर पंचायत समित्यांच्या १ हजार २८८ जागांसाठी ५ हजार १६७ उमेदवारांमध्ये लढत होत आहे. सर्व ठिकाणी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मात्र गडचिरोली जिल्ह्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने सकाळी ७.३० ते दुपारी ३ वाजपर्यंतच मतदानाची वेळ असेल. या सर्व ठिकाणी २३ फेब्रुवारी २०१७ रोजी मतमोजणी होईल.

**मतदानाचा हक्क बजवा**

या सर्व निवडणुकांची तयारी पूर्ण झाली असून राज्य निवडणूक आयोगाची संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे. कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी आवश्यक तेवढा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबई पोलीस आयुक्तांकडून वेळोवेळी आढावादेखील घेण्यात आला आहे.

त्यामुळे मतदारांनी आता निर्भयपणे घराबाहेर पडून मतदानाचा आपला हक्क अवश्य बजवावा, असे आवाहन श्री. सहारिया यांनी केले.

**महानगरपालिकानिहाय (कंसात जागा) उमेदवार: बृहन्मुंबई (२२७)**- २,२७५, **ठाणे (१३१)**- ८०५, **उल्हासनगर (७८)**- ४७९, **पुणे (१६२)**- १,०९०, **पिंपरी-चिंचवड (१२८)**- ७७४, **सोलापूर (१०२)**- ६२३, **नाशिक (१२२)**- ८२१ **अकोला (८०)**- ५७९, **अमरावती (८७)**- ६२७ आणि **नागपूर (१५१)**- १,१३५. **एकूण (१,२६८)**- ९,२०८.

**जिल्हा परिषद व पंचायत समितीनिहाय** (कंसात एकूण जागा): **रायगड (५९)**- १८७, **रत्नागिरी (५५)**- २२६, **सिंधुदुर्ग (५०)**- १७०, **नाशिक (७३)**- ३३८, **पुणे (७५)**- ३७४, **सातारा (६४)**- २८५, **सांगली (६०)**- २२९, **सोलापूर (६८)**- २७८, **कोल्हापूर (६७)**- ३२२, **अमरावती (५९)**- ४१७, **वर्धा (२)**- ८, **यवतमाळ (६)**- ३४ आणि **गडचिरोली (१६)**- ८८. **एकूण (६५४)**- २,९५६. **या जिल्हा परिषदांतर्गतच्या ११८ पंचायत समित्या** (एकूण जागा १२८८)- ५,१६७.

**एकूण व्याप्ती**

- एकूण जागा- ३,२१०
- उमेदवार- १७,३३१
- मतदार- ३,७७,६०,८१२
- मतदान केंद्रे- ४३,१६०
- मतदान यंत्रे- सीयू ६८,९४३ व बीयू- १,२२,४३१
- कर्मचारी- २,७३,८५९

**महानगरपालिका ठळक नोंदी**

- एकूण जागा- १,२६८
- उमेदवार- ९,२०८
- पुरूष मतदार- १,०४,२६,२८९
- महिला मतदार- ९१,१०,१६५
- इतर मतदार- ७४२
- एकूण मतदार- १,९५,३७,१९६
- मतदान केंद्रे- २१,००१
- मतदान यंत्रे- सीयू- ५२,२७७ व बीयू- ५६,९३२
- कर्मचारी- १,२९,७६१
- वाहने- ६,८६८

**जि. प. आणि पं. स. ठळक नोंदी**

- जि. प. एकूण जागा- ६५४
- जि. प. उमेदवार- २,९५६
- पं.स. एकूण जागा- १,२८८
- पं.स. उमेदवार- ५,१६७
- पुरूष मतदार- ९४,४३,९११
- महिला मतदार- ८७,७९,६०४
- इतर मतदार- १०१
- एकूण मतदार- १,८२,२३,६१६

- मतदान केंद्रे- २२,१५९
- मतदान यंत्रे- सीयू ४३,६६६ व बीयू- ६५,४९९
- कर्मचारी- १,४४,०९८

**कायदा व सुव्यवस्थेबाबत कार्यवाही**

- प्रतिबंधात्मक कारवाई-५४,०२५
- नाकाबंदी- ९,७००
- अवैध शस्त्र जप्त- २११
- रोकड जप्त- ७५,६६,९८० (प्रकरणे १७)
- अवैध दारू- ६,८१,५५६ लीटर (प्रकरणे १०,८९८)
- आचारसंहिता भंग प्रकरणे- ३३८
- मालमत्ता विद्रुपीकरण- ७७
- तडीपार- ३७१

**ट्रु वोटर ॲप**

- ट्रु वोटर ॲप डाऊनलोड- १,३५,०००
- यादीत नाव, प्रभाग व मतदान केंद्रांचा शोध- ९ लाख मतदार
- मतदान केंद्रांवर पोहचण्यासाठी मार्गक्रमण (मतदार) ९८,०००
- प्रभागातील उमेदवाराची माहिती पाहणाऱ्यांची संख्या- ४५,०००
- अधिकाऱ्यांची नोंदणी २२,२७०

**कॉप ॲप**

- ॲप डाऊनलोड २०,००० (रेटिंग- ४.१)
- ५,३४५ अधिकाऱ्यांनी नोंदणी केली
- ५,३८२ मतदारांनी नोंदणी केली
- ॲपद्वारे एकूण तक्रारी ५०१ दाखल

**मिस् कॉल प्रतिज्ञा**

- मतदारांसाठी ९०२९९०१९०१ या क्रमांकावर मिस् कॉल सुविधा
- एकूण ११,१३,०२२ मतदारांकडून मिस् कॉलद्वारे प्रतिज्ञा
- चॅटबॉट सुविधेचा १२,७९६ जणांकडून वापर

0-0-0